**फौजदारी रिव्हीजन अर्ज क्र.– १०/२०२१**

MHSI010002782021

**निशाणी ५ वरील आदेश**

अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, सावंतवाडी यांनी दि. २७.०३.२०२१ रोजी क्र. फौजदारी/ होळी उत्सव/ परवानगी/ कास/२०२१ मध्ये केलेल्या आदेशाविरुध्द दाखल केला आहे. कार्यकारी दंडाधिकारी, सावंतवाडी यांनी या आदेशाने दि.०२.०४.२०२१ रोजी दु. २.०० पर्यंत कास गावातील श्री देवी माऊली व श्री देव रवळनाथ देवस्थानाकडे सामनेवाला यांना धार्मिक विधी व इतर देवताकृत्य करण्यास परवानगी दिलेली आहे. वास्तविक होळीच्या सहाव्या दिवशी म्हणजे दि.०२.०४.२०२१ रोजी देवस्थानकडे धार्मिक कृत्य करण्याचा व कास गावात त्याचदिवशी देवता कलश फिरविण्याचा मान हा अर्जदार भाईप घराण्याचा आहे. कार्यकारी दंडाधिका–यांची, सामनेवाल्यांस धार्मिक कृत्य करण्याची दिलेली परवानगी बेकायदेशीर व अर्जदार यांच्या परंपरागत मानपान व हक्कांवर गदा आणणारी आहे. सबब, या आदेशास मूळ अर्जाचे निर्णयापर्यंत स्थगिती देण्यात यावी अशी अर्जदाराची विनंती आहे.

०२. अर्जाचे कामी सामनेवाले क्र.१ ते ३ अजिंक्य शंकर पंडित, सुभाष शांताराम पंडीत, नकुल रामचंद्र पंडित तसेच कार्यकारी दंडाधिकारी, सावंतवाडी यांना नोटीस पाठविण्यात आली. सामनेवाले क्र. १ व ४ यांना नोटीस बजावली गेली असून ते हजर झाले आहेत.

०३. अर्जदाराने नि. ११ वर पुरशीस दाखल करुन अर्जाचे काम केवळ १ व ४ यांचेविरुध्द चालविण्याची विनंती केली. त्यानुसार प्रस्तुत अर्ज सामनेवाले क्र. १ व ४ यांच्याविरुध्द चालविणेत आलेला आहे.

०४. सामनेवाला क्र. १ ने नि. ९ वर अर्जाकामी म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार हा अर्ज कार्यकारी दंडाधिका–यांच्या कोणत्या आदेशाविरुध्द करण्यात आला आहे याचा बोध होत नाही. कार्यकारी दंडाधिका–यांनी धर्मिक रितीरिवाजाप्रमाणे देवकृत्यास परवानगी दिली आहे. अर्जदारास धार्मिक विधी व देवताकृत्य करण्याचा हक्क नाही. अर्जदार कथन करीत असलेले कलम १४४ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यावर अंमलात आणावयाचे आहे. हक्क व अधिकार ठरविण्यासाठी नाही. कायदा व सुव्यवस्था बिघडेल असे अर्जदाराचे कथन नाही. अर्जदारांनी त्यांचे तथाकथित हक्क सक्षम न्यायालयाकडून सिध्द करुन घेणे आवश्यक आहे. कार्यकारी दंडाधिका–यांनी दिलेल्या परवानगीस स्थगिती मागता येणार नाही. धार्मिक रितीरिवाजाप्रमाणे कार्यक्रम होऊ नयेत अशी अर्जदारांची इच्छा असल्याने अर्ज केलेला आहे. सबब, अर्ज नामंजूर व्हावा.

०५. सामनेवाला क्र. ४ तहसीलदार स्वतः हजर आहेत. त्यांनी तोंडी युक्तीवाद केला असून त्यांच्या म्हणण्यानुसार कास गावात भाईप आणि पंडीत गटांमध्ये श्री. देवी माऊली व श्री. देव रवळनाथ देवस्थानकडे असणा–या मानपानावरुन बरीच वर्षे वाद सुरु आहे. सदर वाद मिटविण्याचे सर्व प्रयत्न झाले आहेत. तथापि, वाद मिटू शकलेले नाहीत. त्यांनी व्यक्तिगत प्रयत्न देखील केलेले आहेत. तथापि, दरवेळेस देवस्थान उत्सवाच्या काळात दोन्ही घराण्यांकडून मानपानावरुन वाद निर्माण केला जात आहे. दि. २७.०३.२०२१ रोजी त्यांनी कोणताही आदेश दिलेला नसून सामनेवाले क्र. १ ते ३ यांना धार्मिक विधी व देवकृत्ये करण्याची परवानगी दिली आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार दोन्ही घराण्यांनी त्यांचे वाद सक्षम न्यायालयाकडून निर्णित करुन घेणे आवश्यक आहे. सामनेवाले क्र. ४ तर्फे जिल्हा सरकारी वकीलांनी याच आशयाचा युक्तिवाद केला आहे.

०६. अर्ज व म्हणण्याचे अवलोकन केले. अर्जदारातर्फे विधिज्ञ श्री. केसरकर यांनी होळीच्या सहाव्या दिवशी कलश फिरवणे व देवाचे न्हावण वाटप करण्याचा अधिकार केवळ भाईप गटास आहे. याबाबत भाईप व पंडीत गटांमध्ये वाद असून पंडीत गट भाईप गटाचे अधिकार मान्य करीत नाही. याबाबत यापुर्वी देखील अनेकदा प्रकरणे

न्यायप्रविष्ट होती. कार्यकारी दंडाधिकारी यांनी दि.०४.०३.२०२१ रोजी होलिकोत्सवाची परवानगी नाकारली होती. त्याची प्रत अर्जदारास पाठविली होती. असे असताना, दि. २७.०३.२०२१ रोजी त्यामध्ये बदल करुन नव्याने परवानगी दिली आहे. या परवानगीवेळेस अर्जदारांचे म्हणणे मागविले नाही. सबब, हा आदेश स्थगित होणे आवश्यक आहे असा युक्तिवाद केला.

०७. सामनेवाला क्र. १ तर्फे विधिज्ञ श्री. ख्वॉजा यांनी अर्जदार हे कास गावचे स्थानिक रहिवासी नाहीत, त्यांना श्री. देव रवळनाथ व श्री. देवी माऊली देवस्थानाकडे कोणताही हक्क नाही, असा हक्क कोठेही सिध्द झालेला नाही, असे असताना धार्मिक उत्सवास मनाई आणण्याचा अर्जदार गट प्रयत्न करीत असतो असा युक्तिवाद केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, अर्जदार गट सन १८४३ मधील करारनाम्याचा उल्लेख करतो. परंतु हा करार हजर करीत नाही तसेच न्यायालयाचा हुकूमनामा हजर करीत नाही. तथाकथित १९७४ सालचा करार सामनेवाल्यांवर बंधनकारक नाही. पंडित कुटुंबापैकी २ घरे अर्जदारास सामील झाली असून त्यांनी हा करार केला आहे. ॲड.ख्वॉजा यांच्या युक्तिवादानुसार प्रस्तुत रिव्हीजन अर्ज मुळात कायद्याने चालू शकत नाही, कार्यकारी दंडाधिका–यांच्या आदेशाविरुध्द प्रांताकडे अपील करणे आवश्यक आहे, अर्जदाराने ज्या आदेशाविरुध्द रिव्हीजन अर्ज दाखल केला तो आदेश स्पष्टपणे नमूद केलेला नाही. संदिग्ध अर्ज असल्याने अर्जदारास कोणतीही दाद देऊ नये असाही युक्तिवाद केला आहे.

०८. उभय विधिज्ञांचे युक्तिवाद ऐकले. तसेच रिव्हीजन अर्जासोबत दाखल कागदपत्रे अवलोकली. प्रस्तुत रिव्हीजन अर्ज कार्यकारी दंडाधिकारी यांनी दि.२७.०३.२०२१ रोजी दिलेल्या परवानगीविरुध्द केला आहे. या परवानगीच्या संदिग्धतेबाबत युक्तिवाद केला असला तरीही ही परवानगी कास येथील होळी उत्सवाबाबत आहे याबाबत सामनेवालेस पुर्ण कल्पना आहे. त्या अनुषंगाने त्यांनी युक्तिवाद देखील केला आहे. त्यामुळे अर्जाच्या संदिग्धतेवरुन अर्ज चालणेस पात्र नाही हा युक्तिवाद ग्राहय मानता येणार नाही.

०९. कार्यकारी दंडाधिकारी यांनी दिलेल्या परवानगीविरुध्द रिव्हीजन दाखल होऊ शकणार नाही असा सामनेवाल्यांतर्फे युक्तिवाद आहे. याठिकाणी असे नमूद करणे आवश्यक आहे की, कास गावात पुर्वीपासून भाईप आणि पंडीत गटांमध्ये श्री. देव रवळनाथ व श्री देवी माऊली देवस्थानाच्या मानपानावरुन वाद आहेत हे सकृतदर्शनी उघड आहे. कार्यकारी दंडाधिकारी यांनी यापैकी पंडीत गटास दि. ०२.०४.२०२१ रोजी देवताकृत्यास व धार्मिकविधीस परवानगी दिली आहे. भाईप गटा नुसार हा मान परंपरागत त्यांचा आहे. त्यामुळे याविरुध्द दाद मागण्याकरीता हा अर्ज आहे. प्राप्त परिस्थितीत अंतरिम चौकशीचे वेळेस मूळ अर्ज कायदेशीर नाही व दाखल होऊ शकत नाही हा युक्तिवाद अग्राहय आहे.

१०. सामनेवाले क्र. ४ कार्यकारी दंडाधिकारी यांनी दि. ०४.०३.२०२१ रोजी राजाराम दत्ताराम पंडीत वगैरे १२ यांनी दि.२८.०३.२०२१ ते दि.०५.०४.२०२१ या काळात होलिकोत्सवासाठी मागितलेली परवानगी नाकारली. या आदेशाची माहिती भाईप गटास कळविली. त्यानंतर दि. २७.०३.२०२१ रोजी अजिंक्य पंडित वगैरे ३ (सामनेवाले क्र. १ ते ३) यांनी दि. २८.०३.२०२१ ते दि.०३.०४.३०३१ रोजी होणा–या होलिकोत्सवास परवानगी मागितली. ही परवानगी मंजूर करताना देवस्थान व्यवस्थापन समिती, पश्चिम महाराष्ट्र, कोल्हापूर यांचेकडील पत्र तसेच शासनाच्या गृह विभागाकडील परिपत्रक दि. २४.०३.२०२१, चा संदर्भ घेऊन, केवळ दि. ०२.०४.२०२१ रोजी दु.२.०० पर्यंत देवताकृत्य व धार्मिक विधीची परवानगी दिली आहे.

११. ही परवानगी देताना विशिष्ट गटास मनाई दिली नसली तरीही परवानगी मागणा–या पंडीत गटास परवानगी मिळाली आहे हे उघड आहे. दि. ०२.०४.२०२१ रोजी कोणते देवताकृत्य व धार्मिक विधी होतात हे पाहण्यासाठी, पंडीत व भाईप यांच्यात यापुर्वी झालेली न्यायिक प्रकरणे पाहणे उचित ठरेल.

१२. आजमितीस अभिलेखावर पंडीत व भाईप गटांमध्ये कास गावातील श्री देव

रवळनाथ व श्री देवी माऊली देवस्थानाबाबत सन २०१९ पासून चालू असणारे वादविषयक अर्ज दाखल आहेत. उभयतांना ते नाकारण्याचे कोणतेही कारण नाही. यामध्ये फौजदारी /कास/ अर्ज नं. ०३/२०१९ दि. २८.०९.२०१९ चा अर्ज आहे. या अर्जात पंडीत गटाने देवस्थानात त्यांचा कळस फिरवू नये अशी मागणी भाईपगटाने केली आहे. दोन्ही गटांनी तरंग व कळस फिरवू नयेत शांततेत दसरोत्सव साजरा करावा असा कार्यकारी दंडाधिका–यांचा आदेश आहे.

१३. यानंतर फौजदारी रिव्हीजन अर्ज क्र. ३/२०१९ उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी यांनी निर्णित केला असून हा रिव्हीजन अर्ज कार्यकारी दंडाधिकारी यांनी कास/१४४–०३/२०१९ दि. १४.०३.२०१९ रोजी शिमगोत्सवाबाबत केलेल्या आदेशाविरुध्द आहे. या अर्जात भाईप गटाने त्यांचा कळस फिरवू नये अशी पंडीत गटाने मागणी केली होती. उपविभागीय अधिका–यांनी दोन्ही गटांना तरंग व कळस फिरवणे व शिमगोत्सव करणेस मनाई केलेली होती.

१४. उपविभागीय अधिकारी यांनी त्यांच्या न्यायनिर्णयामध्ये उभय पक्षकारांमध्ये श्री देवी माऊली व श्री देव रवळनाथ यांचे मंदिरात तसेच संपूर्ण गावात शिमगोत्सवाच्या शेवटच्या दिवशी कळस फिरवणे व न्हावण वाटप याबाबत वाद आहे असा पंडीत गटाने युक्तिवाद केल्याचा उल्लेख केला आहे. तसेच भाईप गटातर्फे, त्यांना गावातील देवदवस्की व मतमानात १/३ हक्क आहे, सन १९७४ मध्ये उभय पक्षकारांमध्ये झालेल्या नोंदणीकृत करारानुसार भाईप कुटुंबाला गावामध्ये कळस फिरविण्याचा मान असल्याचा युक्तिवाद केल्याचा उल्लेख केला आहे.

१५. सामनेवाल्यांतर्फे उपविभागीय अधिकारी, सावंतवाडी यांच्या न्यायालयातील अपील क्र. १/२०२१ मधील न्यायनिर्णय दाखल करण्यात आला आहे. या आदेशात देखील कलश फिरवण्याच्या कार्यक्रमास मनाई करण्यात आली आहे.

१६. यावरुन उभय गटांतील वाद शिमगोत्सवाच्या शेवटच्या दिवशी कळस

फिरवणे व देवाचे न्हावण वाटप याविषयी आहे व सन २०२१ मध्ये दि. ०२.०४.२०२१ रोजीचा धार्मिक विधी व देवताकृत्य अन्य काही नसून गावात कळस फिरवणे व देवाचे न्हावण वाटप हा आहे हे उघड आहे. हा वाद सन २०१९ पासूनचा नसून त्यास पुर्वेतिहास आहे. हाच वाद सन १९७२ मध्ये उपस्थित झाला होता. तत्कालिन कार्यकारी दंडाधिका–यांनी दोन्ही गटास मनाई केली. त्याविरुध्द केलेला रिव्हीजन अर्ज जिल्हा दंडाधिकारी रत्नागिरी यांनी सन १९७२ मध्ये निर्णित केला आहे. जिल्हा दंडाधिका–यांचा हा निर्णय नि. ४/८वर दाखल आहे.

१७. जिल्हा दंडाधिका–यांनी त्यांच्या न्यायनिर्णयात दिवाणी न्यायालयाच्या दि. २६.११.१८७१ रोजीचा हुकूमनामा व दि. ०३.०२.१८४३ रोजी पंडीत व भाईप गटात झालेल्या करारनाम्याचा उल्लेख केला आहे. या दोन्ही कगादपत्रांस ग्राहय मानून भाईप गटास कास गावातील देवदेवस्की व मतमानात १/३ हक्क आहे व हा हक्क त्यांनी दिवाणी न्यायालयाकडून प्राप्त करुन घेतला आहे असे नमूद केलेले आहे. या कागदपत्रांच्या आधारे तत्कालिन कार्यकारी दंडाधिकारी यांनी दि. २६.०२.१९७२ रोजी पंडीत व भाईप गटास शिमगोत्सव साजरा करण्यास केलेली मनाई योग्य असल्याचा निष्कर्ष नोंदविला आहे. तथापि, जिल्हादंडाधिकारी यांच्या निर्णयाचे दिवशी शिमगोत्सव पार पडलेला असल्याने कायमस्वरुपी नकारार्थी आदेश न करता, उभय गटांस आवश्यकता भासल्यास कार्यकारी दंडाधिका–यांसमक्ष फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १४४ किंवा १०७ नुसार दाद मागण्याची मुभा ठेवून दि. १६.०३.१९७२ रोजी रिव्हीजन अर्ज निर्णित केला आहे.

१८. प्रस्तुत रिव्हीजन अर्जातील अर्जदारांनी या निर्णयानंतर पंडीत व भाईप गटात दि. ११.०४.१९७४ रोजी झालेला नोंदणीकृत करार (छायांकित प्रत ) हजर केला आहे. सामनेवाले क्र. १ तर्फे विधिज्ञांनी या करारास जोरदार आक्षेप नोंदविला असून हा करार पंडीत गटावर बंधनकारक नाही, पंडीत गटातील भाईप यांना सामील व्यक्तिंनी तो केला आहे असा जोरदार युक्तिवाद केला आहे.

१९.	याठिकाणी असे नमूद करणे आवश्यक वाटते की, वादाचे मूळ शिमगोत्सवात कळस फिरवणे व देवाचे न्हावण वाटपाचे असल्याने त्याबाबतचा हा करार अंतरिम ताकीद अर्जाकामी निश्चितच वाचता येईल. हा करार पंडीत व भाईप गटातील पुढारी यांनी केला असून त्यामध्ये भाईप वकल, मळेकर पंडीत वकल आणि दापटीकर पंडीत वकल यांचा प्रत्येकी १/३ हक्क देवदेवस्की व मतमानात असल्याचे नमूद आहे. हा करार नोंदणीकृत असून त्यामध्ये 'शिमग्याचे सणावेळेस भाईप वकलाजवळ असणारा कळस गावोगावी फिरविण्याचा आहे व रुढीनुसार या कळसाचे न्हावण घालावयाचे आहे व त्यानंतर पुर्वांपारच्या वहिवाटीप्रमाणे हा कळस भाईप यांच्या कब्जात रहावयाचा आहे' असे नमूद केलेले आहे.

२०.	या संपूर्ण कागदपत्रांवरुन शिमगोत्सवात कळस फिरवणे व न्हावण वाटप याबाबत भाईप गटाचा व पंडीत गटाचा पुर्वांपार वाद आहे व त्याचे पर्यवसान शिमगोत्सवाच्या बंदीत ब-याचदा झालेले आहे हे उघड आहे.

२१.	प्राप्त परिस्थितीत दि. २७.०३.२०२१ रोजी कार्यकारी दंडाधिकारी यांनी दिलेली परवानगी पंडीत गटास दिली आहे. भाईप गटाने पुर्वीपासून या दोन्ही बाबींवर आपला अधिकार सांगितला असून दि.०२.०४.२०२१ रोजी धार्मिक विधी व देवताकृत्य कोणी करावे याबाबत दि. २७.०३.२०२१ चे अर्जात स्पष्ट उल्लेख नसल्याने व भाईप गटाचे म्हणणे विचारात न घेता ही परवानगी दिल्याने पुर्वीच्या वादाची पुनरावृत्ती झालेली आहे.

२२.	सामनेवालेतर्फे सन १८४३ रोजीचा करार व १८७१ रोजीचा दिवाणी न्यायालयाचा हुकूमनामा अर्जदाराने अभिलेखावर आणावा असा युक्तिवाद केला आहे. हा करार व हुकूमनामा होऊन १५० पेक्षा अधिक वर्षांचा कालावधी लोटला आहे व हा करार उपलब्ध होणे अशक्य आहे. याबाबत न्यायालयीन नोंद घेता येऊ शकते. हा करार व हुकूमनामा सन १९७२ मध्ये जिल्हा दंडाधिकारी यांचेसमक्ष हजर करण्यात आला होता असे जिल्हा दंडाधिकारी यांच्या न्यायनिर्णयातून स्पष्ट झालेले आहे. जिल्हा

दंडाधिका–यांनी या दोन्ही दस्तावेजांवर भिस्त देखील ठेवली आहे. जिल्हा दंडाधिकारी, रत्नागिरी यांच्या निर्णयास देखील ४९ वर्षे लोटली आहेत.

२३. प्राप्त परिस्थितीत, इतका पुरातन वाद कार्यकारी दंडाधिकारी यांच्या दि.२७.०३.२०२१ रोजीच्या परवानगीने निश्चितपणे शमणारा नाही. देवताकृत्य आणि धार्मिकविधी कोणी करावयाचे याबाबत संदिग्धता असल्याने व दोन्ही गटांचे यावर एकमत होत नसल्याने ही परवानगी आहे त्या परिस्थितीत कायम ठेवण्याने निश्चितपणे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार आहे.

२४. धार्मिक विधी व देवताकृत्य दि. ०२.०४.२०२१ रोजी करावयाचे असल्याने उपलब्ध अल्प कालावधीमुळे, तत्पुर्वी हा अधिकार निश्चित कोणत्या गटाचा आहे याबाबत अंतिम निर्णय करता येऊ शकणार नाही किंवा कार्यकारी दंडाधिकारी यांनी कोणत्या अर्जाच्या अनुषंगाने अशी परवानगी दिली हे पाहता येणेदेखील अशक्य आहे.

२५. प्राप्त परिस्थितीत दि. ०२.०३.२०२१ रोजीचे धार्मिक विधी व देवताकृत्याबाबत दोन्ही गटांच्या तीव्र भावना पाहता, कार्यकारी दंडाधिकारी यांची परवानगी योग्य आहे अगर कसे याचा निर्णय होईपर्यंत या परवानगीची अंमलबजावणी स्थगित ठेवणे उचित आहे. यापुर्वीदेखील कळस व तरंग फिरवणे यास दोन्ही गटांस अनेकदा मनाई देण्यात आली आहे. सन २०१९–२० मध्ये होलिकोत्सव झाला. परंतु,कळस फिरवण्यास दोन्ही गटांस मनाई झाली आहे. त्यामुळे या परवानगीस स्थगिती दिल्याने उभय गटांचे नुकसान होणार नाही. तथापि, स्थगिती न दिल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निश्चितच निर्माण होईल. सबब, वर नमूद विवेचनाच्या अनुषंगाने खालील आदेश करण्यात येत आहे.

## आ दे श

१. दि.२७.०३.२०२१ रोजी सामनेवाले क्र. ४ कार्यकारी दंडाधिकारी यांनी दिलेली दि. ०२.०४.२०२१ या दिवशी दुपारी २.०० पर्यंत रितीरिवाजानुसार श्री देव

रवळनाथ व श्री देवी माऊली या देवस्थानाचे देवताकृत्य व धार्मिक विधीची परवानगी पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

२. सामनेवाले क्र. १ यांनी या आदेशाचे संपूर्ण पालन करावयाचे आहे.

सही/-xxx

दिनांकः०१.०४.२०२१.

(वर्षाराणी पत्रावळे)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश -१,
व सहायक सत्र न्यायाधीश,
**<u>सिंधुदुर्ग - ओरोस</u>**.